*जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय*
*(महसूल विभाग)*

क 2012/आरबी/डेस्क-3/टंचाई/नै.आ./कावि-45 दिनांक :- 20/01/2012

## जाहीर निविदा सुचना

**लातूर जिल्हयातील टंचाईग्रस्त गावंना/वाडयांना ट्रक/टॅकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे**
**सन 2012-2013**

1) जिल्हाधिकारी लातूर यांचे कडून ***1 मार्च 2012 ते 28 फेब्रुवारी 2013*** या कालावधीसाठी लातूर जिल्हयातील ग्रामीण भागात ट्रक/टॅकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी खाजगी ट्रक/टॅकर धारकाकडून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

2) निविदा द्वि लिफाफा पद्धतीने सादर करावी लागेल. निविदेच्या सविस्तर अटी व शर्ती व निविदेसोबत दाखल करावयाच्या कागदपत्राचा तपशील कार्यालयीन वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय लातूर च्या महसूल शाखेत पहावयास मिळेल.

3) निविदेचे कोरे फार्म कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी 11.00 ते 17.00 वाजेपर्यंत रुपये 1000.00 (अक्षरी एक हजार फक्त) नगदी भरणा केल्यास दिनांक 06/02/2012 ते दिनांक 27/02/2012 पर्यंत मिळतील.

4) निविदेसोबत इसारा रक्कम रुपये 1,00,000/- (अक्षरी रुपये एक लक्ष फक्त) राष्ट्रीयीकृत बॅकेचा मा. जिल्हाधिकारी, लातूर यांचे नावाने काढलेला डि.डि. सादर करणे आवश्यक आहे.

5) पुर्ण भरलेल्या निविदा दिनांक 28/02/2012 रोजी दुपारी 14.00 वाजेपर्यंत दाखल कराव्यात व या वेळेनंतर अथवा टपालाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

6) प्राप्त निविदा दिनांक 28/02/2012 रोजी दुपारी 16.00 वाजता उघडण्यात येतील.

7) निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी, लातूर यांनी राखून ठेवलेला आहे.

स्थळप्रत मा. जि. अ.
यांचे स्वाक्षरीत /-

स्वाक्षरित /-
जिल्हाधिकारी, लातूर करिता

*निविदेच्या अटी व शर्ती **http://latur.nic.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.*

जिल्हाधिकारी लातूर करिता

फोन नं. (02382)-243234,255204,200205 फॅक्स नं. (02382) 242330
संकेतस्थळ WWW.latur.nic.in E-mail ID collector latur@maharashtra.gov.in rdclatur@gmail.com

*जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय*
*(महसूल विभाग)*

क्र 2012/आरबी/डेस्क-3/टंचाई/नै.आ./कावि-45 दिनांक :- 20/01/2012

## *निविदा सुचना*

***1 मार्च 2012 ते 28 फेब्रुवारी 2013*** या कालावधीत लातूर जिल्हयातील पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणा-या गावांना/वाडयांना टँकर/ट्रकद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी खाजगी ट्रक/टँकर धारकाकडून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

इच्छुक कंत्राटदारांनी **दिनांक 28/02/2012 चे दुपारी 14.00** वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे मोहरबंद निविदा सादर कराव्यात. प्राप्त निविदा **दिनांक 28/02/2012 रोजी दुपारी 16.00** वाजता मा. जिल्हाधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील. ज्या कंत्राटदारांना काळया यादीत घोषीत केले असेल अथवा त्याबाबत कार्यवाही सुरु असेल त्यांनी किंवा त्यांचेशी सलग्न असलेले कंत्राटदारानी निविदा भरु नयेत. अशा कंत्राटदारांनी निविदा भरल्यास त्याची निविदा विचारात घेतली जाणार नाही.

1) निविदेचे कोरे फार्म कार्यालयीन कामकाजाच्या **दिवशी 11.00 ते 17.00** वाजेपर्यंत रक्कम **रुपये 1000/- (अक्षरी एक हजार)** नगदी भरणा केल्यास **दिनांक 06/02/2012 ते दिनांक 27/02/2012 पर्यंत मिळतील.**
2) निविदाच्या अटी/शर्ती निविदा फार्म सोबत दिलेल्या आहेत.
3) निविदा दोन लिफाफे पध्दतीने भरावे लागेल.

अ :- *<u>लिफाफा क्रमांक (1) तांत्रीक निविदेचा लिफाफा</u>*

निविदा उघडण्याच्या दिवशी वैध असलेले खालील कागदपत्रे लिफाफा क्रमांक 1 मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

1) या लिफाफ्यात इसारा रक्कम **रु. 1,00,000/- (अक्षरी एक लक्ष)** चा राष्ट्रीयीकृत बँकेचा, मा. जिल्हाधिकारी, लातूर यांचे नावाने काढलेला डी.डी.
2) ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा समाधानकारक केलेला असल्याबाबतचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, तहसीलदार व गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेकडे काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र असावे.
3) सक्षम अधिका-यांचे आयकर नोंदणी प्रमाणपत्र अथवा निविदाधारक आयकरदाता असल्यासबाबतचा पुरावा.
4) स्वतःच्या मालकीच्या असलेल्या किमान 10 (दहा) वाहनाच्या
   - अ :- प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडे वाहनांची नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र. (आर.सी. बुक प्रती)
   - ब :- वाहनाचे वाहन कर व विमा भरणा केले बाबतचे प्रमाणपत्र.
   - क :- टँकर/ट्रक सुस्थितीत असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे फिटनेस व टॅक्स भरणा केल्याचे प्रमाणपत्र.
5) भागीदारी संस्था असल्यास सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था यांचे प्रमाणीत प्रत व संस्थेचा दोन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल (मत्ता-दायीत्वासह)
6) कोणत्याही राष्ट्रीयीकृत अथवा शेडयुल्ड बँकेचे जिल्हाधिकारी, लातूर यांचे नावे देय असलेले **रुपये 2.00 लक्ष (अक्षरी दोन लक्ष )** किंमतीचे बँक गॅरंटी

वरील सर्व प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती लिफाफा क्रमांक 1 मध्ये सादर कराव्यात. व तांत्रीक लिफाफ्यामध्ये वरील प्रमाणे 1 ते 6 प्रमाणीत कागदपत्रे नसल्यास निविदाधारकाचा लिफाफा क्रमांक 2 व्यापारी लिफाफा उघडला जाणार नाही. लिफाफा क्रमांक 1 मध्ये कोणतेही मुळ प्रमाणपत्रे सादर करु नयेत. मात्र लिफाफा क्रमांक 1 मध्ये सादर केलेल्या प्रतीची मुळ प्रमाणपत्रे निविदा उघडतेवेळी निविदा धारकांनी पडताळणीसाठी स्वतः जवळ ठेवणे आवश्यक राहील. याची निविदाधाराकांनी नोंद घ्यावी.

ब) *<u>लिफाफा क्रमांक (2)</u>*

यामध्ये विहित केलेल्या निविदा पत्रकात दर भरुन लिफाफा अटी व शर्तीसह मोहरबंद करुन सादर करावा लागेल. सदरील लिफाफ्यावर " **टंचाईग्रस्त गावासाठी पिण्याचा पाणी पुरवठा सन 2012-2013 दर पत्रकाचा लिफाफा** " असे लिहावे.

1) निविदा उघडण्याची तारीख व वेळ आवश्यक असल्यास बदलण्याबाबतचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.
2) लिफाफा क्रमांक (1) अगोदर उघडला जाईल. त्यामधील कागदपत्रे विहीत केल्यानुसार नसतील तर लिफाफा क्रमांक (2) उघडला जाणार नाही. म्हणजेच ती निविदा विचारात न घेता नामंजुर करुन दप्तर जमा केले जाईल.

**स्थळप्रत मा. जि. अ.**
**यांचे स्वाक्षरीत /-**

जिल्हाधिकारी, लातूर करिता

फोन नं. (02382)-243234,255204,200205 फॅक्स नं. (02382) 242330
संकेतस्थळ WWW.latur.nic.in E-mail ID collector latur@maharashtra.gov.in rdclatur@gmail.com